## तिरकसवाडी येथे कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णीतर्फे आदिवासी शेतकऱ्यांना मार्गदर्शन व निविष्ठा वाटप

**मुदखेड (दि. ७ जुलै २०२६):**

आदिवासी उप योजना (TSP) अंतर्गत तालुक्यातील तिरकसवाडी येथे कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेड-१ च्या वतीने शेतकरी मार्गदर्शन व निविष्ठा (आंबा रोपे व वर्मिबेड ) वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाप्रसंगी तिरकसवाडीचे सरपंच श्री.ज्ञानेश्वर गव्हांडे हे अध्यक्षस्थानी तर के. वि. के. पोखर्णीचे डॉ. देविकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी परिसरातील आदिवासी शेतकरी बांधव भगिनी व जिल्हा परिषद आंधवाडी /तिरकसवाडी चे विद्यार्थी व शिक्षकही उपस्थित होते.

यावेळी कृषि विज्ञान केंद्र,पोखर्णी, नांदेड-१ च्या तज्ञांनी शेतकऱ्यांना आदिवासी उपयोजना आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात खालील तज्ञांनी विविध विषयांवर प्रकाश टाकला:

डॉ. देविकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख): यांनी आदिवासी उप योजनेचे महत्त्व आणि शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीची कास धरून आपले आर्थिक उत्पन्न कसे वाढवावे, याबद्दल मार्गदर्शन केले.

प्रा. संदीप जायभाये (कृषि विद्यातज्ञ): यांनी योग्य पेरणी पद्धती, खत व्यवस्थापन आणि आंतरपीक पद्धतीबद्दल माहिती दिली.

सौं. अलका पवळे (गृह विज्ञान तज्ञ): यांनी महिलांचे सक्षमीकरण, पोषण आहार आणि शेतीपूरक घरगुती उद्योगांविषयी महिला शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले.

डॉ. सौं. अमिता क्षत्रिय (कृषि विस्तार तज्ञ): यांनी शासकीय योजना, शेतकरी गट निर्मिती आणि कृषि आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या विविध माध्यमांवर चर्चा केली.

मार्गदर्शनानंतर उपस्थित गरजू शेतकरी बांधवांना योजनेअंतर्गत विविध कृषी निविष्ठा वर्मी बेड व आंबा रोपे वाटप करण्यात आले. या उपक्रमाबद्दल तिरकसवाडी येथील शेतकऱ्यांनी कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णीच्या संपूर्ण टीमचे आभार मानले.या कार्यक्रमासाठी के. वि. के. पोखर्णीचे श्री. संतोष वाघमारे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.


आदिवासी उप-योजना
Tribal Sub-Plan